मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे

# अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

मोतीबाग, रेल्वे उड्डाणपुला जवळ, जालना.

नॅक (NAAC) द्वारा पूनर्मूल्यांकनात 'A' दर्जा प्राप्त, ISO 9001 : 2008 प्रमाणित

## * ग्रंथप्रदर्शन व विक्री *

प्रिय बंधु व भगिनींनो,

''कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'' या भगवत् गीतेतील सारसंदेशा प्रमाणे आपली कृती व उक्ती ठेऊन जीवनाचा इत्यर्थ साधणारे; महाराष्ट्र, मराठवाडा आणि विशेषत: जालना जिल्ह्यात विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा अनमोल ठसा निर्माण करणारे द्रष्टे लोकनेते; शिक्षण व सहकार महर्षी आमचे श्रद्धास्थान अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या जयंती निमित्त आयोजित या महोत्सवांतर्गत विविध उपक्रमांपैकी एक उपक्रम जालना येथील 'अंकुशराव टोपे महाविद्यालयात' दि. १६ सप्टेंबर ते दि. १८ सप्टेंबर २०१६ या कालावधीत भव्य अशा **'ग्रंथ प्रदर्शन व विक्री'** चे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रंथ प्रदर्शनात, विक्रीसाठी विविध भारतीय व परदेशी भाषांतील पुस्तकांचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, वितरक व प्रकाशन व्यवसायाशी निगडित घटक या ग्रंथ प्रदर्शनात मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. यातून विद्यार्थी व समाजामध्ये वाचनाची आवड वृद्धीगंत व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रथमच जालना शहरात अशा प्रकारचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अंकुशराव टोपे यांचा वाचनाचा आवाका प्रचंड मोठा होता. राजकारणात असूनही वाचनासाठी वेळात वेळ काढायचे; महाविद्यालयाच्या ग्रंथालयात स्वत: येवून अनेक दुर्मिळ ग्रंथाचा शोध घ्यायचे. आयुष्याच्या शेवटपर्यंत व आजारपणातही त्यांनी भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तीमत्व, ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सबंध देशावर छाप पाडली अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, शहाजी राजे, संभाजी च्या जीवनावर छावा, ययाती, पाणीपत, महाश्वेता आपल्या अचेतन मनाची शक्ती, इत्यादी अनेक पुस्तकांचे व नामवंत साहित्यिकांची ग्रंथ संपदा वाचली आहे. त्यांचे व्यक्तीमत्व हे तरुण पिढीला प्रेरणादायी ठरावे असे होते.

मित्रहो ! त्यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून जालना जिल्ह्यातील सर्व शाळा-महाविद्यालये सार्वजनिक वाचनालये, आणि समाजातील सर्व स्तरावरील वाचक वर्गासाठी ही एक अमूल्य अशी पर्वणी असणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनात विविध स्पर्धा परीक्षा संदर्भात पुस्तके, कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, समीक्षात्मक संदर्भ ग्रंथ, ऐतिहासिक ग्रंथ, वैचारिक साहित्य, धार्मिक ग्रंथ, कृषी विषयक, कायदा, व्यक्तीमत्व विकास, व्यवसायिक इत्यादी अशा दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन व सवलतीत पुस्तके उपलब्ध होणार आहेत. तरी बंधु-भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने या संधीचा लाभ घ्यावा, ही विनंती.

स्थळ : अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना. वेळ : सकाळी १०.०० ते रात्री ९.००

त्रिमूर्ती प्रिन्टर्स, जालना मो.9423711052